मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# सांगवीत पवनथडी जत्रेचे उद्घाटन आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते

## उपमहापौर शर्मिला बाबर व मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात शुभारंभ, पहिल्याच दिवशी खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी...

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातील महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तू व खाद्यपदार्थांच्या विक्रीसाठी पवनथडी जत्रा हे एक मोठे व्यासपीठ ठरले आहे. जत्रेत सहभागी असलेल्या स्टॉलधारक महिलांनी आपला व्यवहार डिजिटल पद्धतीने करावा, ज्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला हातभार लागेल. पवनथडी जत्रेच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यासोबतच त्यांचे मनोधैर्य वाढविण्यावर पिंपरी चिंचवड महानगरपालिका भर देत आहे. पिंपरी चिंचवड शहरात भविष्यात महिलांसाठी मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती कशी करता येईल, यासाठी महापालिका निश्चितच पुढाकार घेईल, असे प्रतिपादन आमदार शंकर जगताप यांनी केले.



महिला बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने दिनांक २६ फेब्रुवारी ते १ मार्च २०२६ या कालावधीत पवनथडी जत्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या जत्रेचे उद्घाटन चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

या उद्घाटनप्रसंगी उपमहापौर शर्मिला बाबर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, माजी महापौर शकुंतला धराडे, नगरसदस्य शत्रुघ्न काटे, अभिषेक बारणे, शाम जगताप, ज्ञानेश्वर उर्फ माऊली जगताप, बाबासाहेब त्रिभुवन, संजय काटे, प्रभाकर वाघेरे, तानाजी बारणे, नगरसदस्या तृप्ती कांबळे, उज्वला ढोरे, अनुराधा गोरखे, आरती चौंधे, मनिषा पवार, सुषमा तनपुरे, दिप्ती कांबळे, पल्लवी जगताप, निता पाडाळे, सुप्रिया चांदगुडे, नीता जगताप, सारिका मासुळकर, रविना आंगोळकर, योगिता नागरगोजे, कुंदा भिसे, अनिता काटे, सविता खुळे, दिप्ती कांबळे, अर्चना तापकीर, महापौर यांच्या पत्नी श्रध्दा लांडगे, तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, समाज विकास विभागाच्या उपायुक्त ममता शिंदे, उप आयुक्त सिताराम बहुरे, संदीप खोत, अर्चना केरूरे, महापालिकेचे क्षेत्रीय अधिकारी, विविध विभागातील कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपायुक्त ममता शिंदे यांनी तर सूत्रसंचालन जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले. उपस्थितांचे आभार महिला व बालकल्याण समितीच्या राणी पठारे यांनी मानले.

यानंतर सादर करण्यात आलेल्या 'महाराष्ट्राचा मराठी बाणा' या सांस्कृतिक कार्यक्रमालाही नागरिकांनी मोठी उपस्थिती लावली.

### पवनथडी जत्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**» पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागाच्या वतीने महिलांच्या सक्षमीकरणासाठी पवनथडी जत्रेचे आयोजन सांगवी येथील पीडब्ल्यूडी मैदान येथे करण्यात येते. यंदाही याच मैदानावर पवनथडी जत्रा भरविण्यात आली आहे. या जत्रेत ८०० हून अधिक स्टॉल्स उभारण्यात आले असून, महिला बचत गटांनी तयार केलेल्या विविध वस्तू विक्रीसाठी ठेवण्यात आल्या आहेत. महाराष्ट्राच्या खाद्यसंस्कृतीची चव जपणारे शाकाहारी व मांसाहारी यांसह पारंपरिक पदार्थही येथे उपलब्ध आहेत. तसेच नागरिकांच्या मनोरंजनासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पुढील चार दिवस या जत्रेमध्ये महिलांनी तयार केलेली उत्पादने व विविध खाद्यपदार्थ विक्रीसाठी उपलब्ध असणार असून, सांस्कृतिक कार्यक्रमांचीही मेजवानी नागरिकांना अनुभवता येणार आहे.पवनाथडी जत्रा सर्वांसाठी खुली असून प्रवेश विनामूल्य आहे.**

# स्थायी समिती अध्यक्षपद निवडणुकीच्या निमित्ताने सेना-राष्ट्रवादीच्या "बालेकिल्ल्यात सुरुंग"

## अभिषेक बारणेंसह विविध समिती अध्यक्षपदाची संधी देताना रणनिती: प्रभाग 23- 24 मध्ये भाजपाची ताकद वाढवण्याचा प्रयत्न

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या तिजोरीच्या चाव्या आता भाजपाचे नगरसेवक अभिषेक बारणे यांच्या हातात जाणार यावर शिक्कामोर्तब झाले. कारण, समिती सदस्यांमध्ये बहुमत सत्ताधारी भाजपाचे आहे. समिती अध्यक्षांच्या नियुक्तीमध्ये भाजपाने "पॉलिटिकल स्ट्रॅटजी" वापरली आहे. यामध्ये शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या बालेकिल्ल्यात सुरूंग लावला आहे.




महापालिका निवडणुकीतील प्रभाग रचनेमध्ये प्रभाग क्रमांक 23 आणि 24 हा शिवसेना शिंदे गटाचे खासदार श्रीरंग बारणे यांचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. सोबत थेरगाव गावठाणसह प्रसुनधाम, गंगा आशियाना, कुणाल रेसिडेन्सी, स्विस कॉऊंटी, पडवळनगर भाग, पवार नगर, बापुजी बुवा नगर, जयमल्हार नगर भाग, बनगर बाबा मंदिर परिसर, अशोका सोसायटी, साईनाथनगर, समर्थ कॉलनी आणि प्रभाग क्र. 24 मधील अदित्य बिर्ला हॉस्पिटल, दत्तनगर, पद्मजी पेपरमिल, ग्रिन्स हाऊसींग सोसायटी, गंगा ओशियन मिडोज, पडवळनगर भाग, गणेशनगर, म्हातोबानगर, प्रथम सोसायटी, क्रांतीनगर, महाराष्ट्र कॉलनी, तुल्यबळ

( उर्वरित पान २ वर )

**"भारतीय जनता पार्टीमध्ये पक्षशिस्तीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. निवडून आलेल्या प्रत्येक नगरसेवकांना महत्त्वाच्या पदांवर काम करण्याची महत्त्वाकांक्षा असते. स्थायी समिती अध्यक्षपदासाठी कोअर कमिटीने पक्षश्रेष्ठींना शिफासर केली होती. त्यामध्ये पक्षश्रेष्ठींनी पक्ष संघटन आणि शहराच्या हिताचा विचार करुन निर्णय घेतला आहे. भाजपा एक परिवार आहे. गट-तट असे काही नाही. प्रत्येकजण आपआपल्या परीने पद मिळवण्यासाठी प्रयत्न करीत असतो. पक्षश्रेष्ठींनी निर्देशीत केलेल्या नगरसेवकांसोबत अध्यक्षपदाचे अर्ज दाखल करण्यासाठी मी स्वत: उपस्थित होतो. नाराजी असण्याचे कारण नाही. पण, प्रत्येकाला न्याय देता येईल यासाठी प्रयत्नशील आहोत.**

**- शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# दस्त नोंदणी नाकारल्याप्रकरणी सह दुय्यम निबंधकांविरुद्ध तक्रार

## वडमुखवाडी येथील मालमत्तेचा व्यवहारासंबंधी आरोप, पोलीस आणि जिल्हा निबंधकांकडे तक्रार दाखल

**पिंपरी | प्रतिनिधी**

वडमुखवाडी येथील जमिनीच्या दस्त नोंदणीला सह दुय्यम निबंधकांनी बेकायदेशीरपणे नकार दिल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला असून, याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्यासाठी पोलीस आणि जिल्हा निबंधकांकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे.

मळालेल्या माहितीनुसार, भोसरी येथील रहिवासी सौ. शुभांगी शशिकांत सालगुडे यांनी मौजे वडमुखवाडी येथील स. नं. ८० हि. नं. ४ मधील १२०० चौ. फूट क्षेत्राची मिळकत खरेदीखताने विकत घेण्यासाठी दि. २३ फेब्रुवारीला सर्व आवश्यक कागदपत्रे आणि पूर्ण मुद्रांक शुल्कासह सह दुय्यम निबंधक हवेली नं. २४, पुणे यांच्याकडे दस्त सादर केला होता. मात्र, संबंधित निबंधकांनी या दस्ताची नोंदणी करण्यास बेकायदेशीरपणे नकार देऊन नको त्या कागदपत्रांची मागणी केली व अर्जदाराची दिशाभूल केली. प्रत्यक्षात, दुय्यम निबंधकांना मालमत्तेचे मालकी हक्क तपासण्याचे किंवा दस्ताची वैधता ठरविण्याचे अधिकार नसून, नोंदणी कायद्याच्या कलम ३४ व ३५ नुसार दस्त नोंदविणे हे त्यांचे कर्तव्य आहे.

या कृतीमुळे शासकीय कर्तव्यात अडकाठी आणल्याप्रकरणी फौजदारी गुन्हा घडल्याचा आरोप करत सालगुडे यांनी निगडी पोलीस स्टेशन, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्त आणि सह जिल्हा निबंधक यांच्याकडे धाव घेतली आहे. त्यांनी संबंधित अधिकाऱ्याला तातडीने निलंबित करून कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.




> “ दुय्यम निबंधकांना दस्त नोंदणी नाकारता येत नाही, असा न्यायालयाचा निकाल आहे. बेकायदेशीर बांधकाम असले तरीही दस्त नोंदविला पाहिजे अशी कायद्यात तरतूद असताना, हक्क डावलून सामान्य नागरिकांची फसवणूक करणाऱ्या अशा अधिकाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई होणे आवश्यक आहे.
>
> - ॲड. बाळासाहेब थोपटे अर्जदाराचे वकील

# स्ट्रक्चरल प्लानवर निर्बंध

## विकास आराखडा रद्द झाल्यानंतर गोंधळ कायम




**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा प्रारूप विकास आराखडा रद्द झाल्यानंतर प्राधिकरणातील समाविष्ट तालुक्यातील गावांचा विकास करण्याच्या अनुषंगाने स्ट्रक्चरल प्लान तयार करा, अशा सूचना राज्य शासनाने पीएमआरडीए दिल्या होत्या; परंतु आता स्ट्रक्चरल प्लानवर कार्यवाही सुरू असतानाच त्यावर राज्य नगरविकास विभागाने निर्बंध आणले आहेत. त्यामुळे पीएमआरडीकडील विकासकामांत अडथळे निर्माण झाले आहेत. त्यातच वेगवेगळ्या 20 ठिकाणांचा टीपी योजनाही रखडल्या आहेत.

मुख्यमंत्री तथा पीएमआरडीएचे अध्यक्ष देवेंद्र फडणवीस यांनी पीएमआरडीएचा प्रारुप विकास आरखाडा रद्द केल्यानंतर झालेला गोंधळ अद्याप दूर झालेला नाही. त्यातच राज्य शासनाकडील विकासकामांबाबतचे आदेश सतत बदलत असल्याने पीएमआरडीएच्या अधिकाऱ्यांना विकासकामांबाबत कोणताही निर्णय घेता येत नाही. पीएमआरडीचा विकास आराखडा रद्द झाल्याने त्यावेळच्या रस्ते व विकासकामांचे आराखडे नव्याने तयार करावे लागणार आहेत. पीएमआरडीएतील जवळपास 9 तालुक्यांचा विकास खुंटला असल्याचे दिसून येते. त्यामुळे पीएमआरडीएच्या हद्दीत नव्या रस्त्यांची जाळे, प्रकल्प, उड्डाणपूल अथवा पायाभूत सुविधा उभरण्यास विलंब होत आहे.

# स्थयी समिती अध्यक्षपद निवडणुकीच्या निमित्ताने सेना-राष्ट्रवादीच्या "बालेकिल्ल्यात सुरुंग"

( पान 1 वरून )

यशदा कॉलनी, गुजरनगर, मंगलनगर, बेलठिकानगर भागात शिवसेना आणि राष्ट्रवादीची ताकद भाजपापेक्षा तुलनेत आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात एकूण 32 प्रभाग आहेत. यामध्ये प्रभाग 9, 14, 20, 22, 23, 24 आणि 30 या प्रभागांचा अपवाद वगळता अन्य 25 प्रभागांमध्ये भाजपाची ताकद प्रभावी आहे. त्यामुळे ज्या प्रभागात निवडणुकीत भाजपाची कामगिरी सक्षम राहीली नाही. त्या भागात महत्त्वाची पदे किंवा जास्तीची ताकद लावली जात आहे. क्रीडा समिती सभापती पदाचे उमेदवार कैलास कुटे (प्रभाग-14), शहर सुधारणा समिती सभापती पदाचे उमेदवार संजय काटे (प्रभाग- 30) यांच्या नियुक्तीचा विचार केला असता भाजपाची रणनिती स्पष्ट अधोरेखित होते.

प्रभाग 23 मधून भाजपाच्या तिकीटावर मनिषा पवार, तानाजी बारणे आणि अभिषेक बारणे निवडून आले आहेत. या प्रभागातून भाजपाच्या सोनाली गाडे यांचा पराभव झाला आणि राष्ट्रवादीच्या योगीता बारणे यांनी निवडणूक जिंकली आहे. प्रभाग क्रमांक 24 मध्ये भारतीय जनता पार्टीला एकही जागा मिळाली नाही. खासदार बारणे यांचे पुत्र विश्वजीत बारणे, पुतणे निलेश बारणे शिवसेना "धनुष्यबाण" चिन्हावर निवडून आले आहेत. राष्ट्रवादीच्या माया बारणे यांनी आपले वर्चस्व कायम ठेवले आहे, तर अपक्ष निवडणूक लढवलेल्या शालिनी गुजर यांनी भाजपाला पाठिंबा दिला आहे. परिणामी, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा बालेकिल्ला असलेल्या थेरगाव आणि परिसरात पक्षाची ताकद वाढण्याचा प्रयत्न स्थायी समिती अध्यक्ष नियुक्तीमध्ये भाजपा पक्षश्रेष्ठींनी केला आहे, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

### कोअर कमिटीकडून दोन नावांची

» पिंपरी-चिंचवड महापालिकेत १२८ पैकी तब्बल ८४+१ नगरसेवकांचे बहुमत आहे. स्थायी समितीवर संधी मिळालेल्या सदस्यांमधून नगरसेवक संदीप कस्पटे आणि अभिषेक बारणे यांची नावे अध्यक्षपदासाठी चर्चेत होती. पक्षाच्या कोअर कमिटीतील सात सदस्यांनी दोन नावे प्रदेश पक्षश्रेष्ठींकडे पाठवली. त्यापैकी अभिषेक बारणे यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले. किंबहुना, भाजपाचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी संदीप कस्पटे यांच्या नावाची शिफारस केली होती आणि आमदार शंकर जगताप यांनी अभिषेक बारणे यांच्या नावाची शिफारस केल्याचे बोलले जात आहे.

### अभिषेक बारणे कोण आहेत?

» थेरगाव येथील बारणे कुटुंबियातील अभिषेक बारणे यांचे वडील बजाज ऑटो कंपनीत होते. वडील उच्चशिक्षीत असल्यामुळे त्यांनी अभिषेक यांना वाकड येथील प्रतिथयश वुड्स अमेरिटन या कॉन्व्हेंट स्कूलमधून त्यांनी शिक्षण घेतले. घरामध्ये कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नाही. त्यांनी २०१० मध्ये राजकीय क्षेत्रात करिअरला सुरूवात केली. ते उच्चशिक्षित असून, पेशाने सीव्हील इंजिनिअर आहेत. वयाच्या २१ व्या वर्षी त्यांनी महापालिका निवडणूक लढवली होती. मात्र, या निवडणुकीत त्यांचा सुमारे ४०० मतांनी पराभव झाला होता. त्यानंतर त्यांना दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी २०१७ मध्ये उमेदवारी दिली. त्यांना स्थायी समिती सदस्यपदी काम करण्याची संधी मिळाली. त्यानंतर त्यांनी थेरगाव हॉस्पिटल, बटरफ्लाय ब्रीज आणि अंतर्गत रस्ते आणि विकासकामांवर भर दिला. २०२६ मध्ये पुन्हा त्यांनी विजयी घोडदौड कायम ठेवली. अनुभवाच्या जोरावर त्यांना थेट स्थायी समिती अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात येणार आहे.

### शत्रुघ्न काटे गटाला पुन्हा "वाटाण्याच्या अक्षदा"?

»स्थायी समिती अध्यक्षपदासाठी शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी त्यांचे निकटवर्तीय असलेले संदीप कस्पटे यांचे नाव लावून धरले होते. मात्र, पक्षश्रेष्ठींनी अभिषेक बारणे यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. यासाठी आमदार शंकर जगताप यांनी 'राजकीय ताकद' लावली, अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे. यापूर्वी महापौरपदासाठी स्वत: शत्रुघ्न काटे तीव्र इच्छुक होते. त्यावेळीसुद्धा त्यांना संधी मिळाली नाही. पिंपरी-चिंचवडमध्ये आमदार महेश लांडगे आणि आमदार शंकर जगताप असे भाजपामध्ये गट आहेत, असे मानले जाते. मात्र, शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी स्वता:चा असा प्रभावी गट निर्माण केला

# समाविष्ट गावांच्या 'डीपी'बाबत महापालिकेने घेतला मोठा निर्णय

## महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या 23 गावांमध्ये सर्वांगीण विकास होणे गरजेचे आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या २३ गावांमध्ये सर्वांगीण विकास होणे गरजेचे आहे. या गावांमधील नागरिकांना आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही महापालिका प्रशासनाची जबाबदारी आहे. यासाठी आवश्यक ती पावले उचलण्यास महापालिकेने सुरुवात केली आहे.

महापालिकेच्या हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावातील बांधकामांचे अधिकार आता महापालिकेकडे देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यामुळे या गावांचा सर्वांगीण विकास करायचा असेल, तर गावांचा विकास आराखडा (डीपी) तयार करणे आवश्यक आहे. यासाठी पुढील आठवड्यात बैठक घेतली जाणार आहे. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर ही बैठक होणार आहे.

ही गावे महापालिकेत आल्यानंतर तेथे आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा पुरविण्याची जबाबदारी राज्य सरकारने महापालिकेवर टाकली होती. त्यामुळे या गावातील नागरिकांना पिण्याचे पाणी, घनकचरा व्यवस्थापन तसेच मलनिस्सारण वाहिन्यांची कामे पूर्ण करणे, आरोग्य सेवा पुरविणे ही कामे महापालिकेला करावी लागत होती. तर, बांधकाम परवानगी आणि बांधकाम विकसन शुल्क वसूल करण्याचे अधिकार राज्य सरकारने 'पीएमआरडीए' कडे दिले होते. त्यामुळे या गावांमधून गोळा होणारा महसूल 'पीएमआरडीए' च्या तिजोरीत जमा होत होता.




### सर्वसाधारण सभेत सभासदांनी मांडले गाऱ्हाणे

**» महापालिकेची निवडणूक होऊन सर्वसाधारण सभा अस्तित्वात आली आहे. गेल्या आठवड्यात महापालिकेची पहिली सर्वसाधारण सभा झाली. यामध्ये समाविष्ट गावांमधून प्रतिनिधित्व करणाऱ्या नगरसेवकांनी तेथील अडचणी सभागृहात मांडल्या. सर्वपक्षीय सभासदांचा यामध्ये समावेश होता. या गावांचा विकास आराखडा तातडीने करून आवश्यक त्या सुविधा देण्याची मागणी यावेळी करण्यात आली होती.**

समाविष्ट गावांमधील बांधकामांचे अधिकार महापालिकेला द्यावेत, अशी मागणी केली जात होती. यासाठी माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीदेखील पुढाकार घेत नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा केला होता. त्यासाठी फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला होता. महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या गावांमधील बांधकाम परवानगीचे अधिकार पीएमआरडीएकडून काढून ते महापालिकेला देण्यात आल्याचा शासन आदेश काही दिवसांपूर्वी राज्य सरकारने काढला आहे.

### २३ गावांचा डीपी तयार होणार

**» पुणे महापालिकेत समाविष्ट झालेल्या २३ गावांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी विकास आराखडा (डीपी) तयार करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. महापालिका आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण(पीएमआरडीए) यांच्यात पुढील आठवड्यात विशेष बैठक होणार असून, त्यात सविस्तर चर्चा केली जाणार आहे.**

### बांधकाम परवानगीचे अधिकार महापालिकेकडे

**» राज्य सरकारने समाविष्ट गावांतील बांधकाम परवानगीचे अधिकार पीएमआरडीएकडून काढून महापालिकेकडे वर्ग केले आहेत. यापूर्वी पाणी, मलनिस्सारण व कचरा व्यवस्थापनाची जबाबदारी महापालिकेकडे होती; मात्र महसूल पीएमआरडीएकडे जात होता. आता नियोजन आणि महसूल दोन्ही अधिकार महापालिकेकडे आल्याने विकासकामांना गती मिळणार आहे.**

महापालिकेकडे समाविष्ट गावांचा निर्णय घेण्याचे अधिकार आल्याने या गावांचा विकास आराखडा तयार करण्याची जबाबदारी महापालिकेवर आली आहे. 'पीएमआरडीए'ने या गावांच्या विकास आराखड्यावर केलेले काम नक्की काय होते, त्यासाठी काय प्रक्रिया केली याबाबत सविस्तर चर्चा करण्यासाठी महापालिकेतील अधिकारी आणि 'पीएमआरडीए' मधील अधिकारी यांची विशेष बैठक पुढील आठवड्यात घेतली जाणार आहे. या बैठकीत सविस्तर चर्चा केली जाणार असल्याचे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी यांनी सांगितले. या बैठकीनंतर गावांच्या डीपीबाबत पुढील नियोजन केले जाईल, असेही पृथ्वीराज यांनी सांगितले.

# संकट निवारणासाठी सुक्ष्म नियोजन करण्याचे महापौरांचे आदेश !

## पावसाळापूर्वीच्या कामांबाबत सर्व संबंधित यंत्रणांची एकत्रित बैठक घ्यावी, असे आदेश महापौर मंजूषा नागपुरे यांनी प्रशासनाला दिले.

**पुणे | प्रतिनिधी**

पावसाळापूर्वीच्या कामांची तयारी करताना सूक्ष्म नियोजन करण्यात यावे. आपत्ती निवारणासाठी प्रभागाच्या पातळीवर पथके तयार करून पावसाळापूर्वीच्या कामांबाबत सर्व संबंधित यंत्रणांची एकत्रित बैठक घ्यावी,' असे आदेश महापौर मंजूषा नागपुरे यांनी प्रशासनाला दिले.

आपत्ती व्यवस्थापन आणि पावसाळापूर्व कामांसंदर्भात महापौर नागपुरे यांनी बैठक घेतली. स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले, विरोधी पक्षनेते नीलेश निकम, महापालिका आयुक्त नवल किशोर राम, अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., पवनीत कौर व ओमप्रकाश दिवटे, उपायुक्त माधव जगताप यांच्यासह विविध विभागांमधील वरिष्ठ अधिकारी या वेळी उपस्थित होते. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन निधीतून सुरू असलेली कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचनाही या बैठकीत देण्यात आल्या.



पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापनाची तयारी करताना समाविष्ट गावांसह संपूर्ण शहराचे सूक्ष्म नियोजन केले जावे. पावसाळा सुरू होण्यापूर्वी कोणती कामे करणे आवश्यक आहे, हे ठरविण्यासाठी महापालिका प्रशासन, जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, महामेट्रो, महावितरण, पीएमआरडीए, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, कटक मंडळांची तातडीने एकत्रित बैठक घ्यावी.

ओढे, नाल्यांची सफाई, कल्व्हर्टची दुरुस्ती व सीमा भिंती यांची कामे वेळेत पूर्ण करावीत. पावसाळी गटारे, ओढे, नाल्यांचे मॅपिंग पूर्ण करावे. धोकादायक वाडे, इमारतींचे सर्वेक्षण करून त्यांना नोटीसा देण्यात याव्यात. अशा सूचना महापौर नागपुरे यांनी बैठकीत केल्या.

### एका ठेकेदाराला तीनच कामे

**» पावसाळापूर्व कामांसाठी ठेकेदारांकडून पूर्वगणन पत्रापेक्षा कमी दराने निविदा येतात. त्यामुळे कामाचा दर्जा राखला जात नाही, हे वारंवार समोर आले आहे. याबाबतच्या तक्रारी देखील महापालिका प्रशासनाकडे दरवर्षी येतात. त्यामुळे यंदा प्रशासनाने विशेष काळजी घेण्याचे ठरविले आहे. 'पावसाळी कामे देताना एका ठेकेदाराला अधिकाधिक तीनच ठिकाणची कामे दिली जाणार आहेत. त्यामुळे संबंधित ठेकेदारावर कामाचा ताण देखील येणार नाही आणि कामांचा दर्जाही राखला जाईल, असे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी यांनी सांगितले.**

टेकडीवरून येणाऱ्या पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी आवश्यक ठिकाणी चर खोदून पाणी जिरवावे. निचरा न झालेले पाणी ओढा-नाल्यामार्फत नदीत जाण्यासाठीचे नियोजन करावे.

समाविष्ट गावातील नकाशानुसार व्यवस्थितपणे नाले बांधून घ्यावेत. पावसाळी वाहिन्या शक्यतो पदपथांच्या खालून घ्याव्यात, नियमित बैठका घेतल्या जाव्यात, अशी सूचना विरोधी पक्षनेते निकम यांनी केली.

# राज्यमंत्री माधुरी मिसाळ नाराज ! आयुक्तांना पाठविले पत्र

## नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी महापालिका प्रशासनाच्या निर्णयावर नाराजी व्यक्त केली आहे.



**पिंपरी | प्रतिनिधी**

पर्वती विधानसभा मतदारसंघातील विकासकामांसाठी ३२ कोटी ८३ लाख रुपयांचा निधी देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने अचानक मागे का घेतला, अशी विचारणा करून नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी महापालिका प्रशासनाच्या निर्णयावर नाराजी व्यक्त केली आहे. प्रस्ताव मागे घेताना प्रशासनाने तांत्रिक आणि प्रशासकीय सुधारणा करण्याचे कारण दिले आहे. यावरदेखील स्पष्टीकरण देण्याचे आदेश मिसाळ यांनी दिले आहेत.

महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांना पत्र पाठवून राज्यमंत्री मिसाळ यांनी याबाबत विचारणा केली असून, याचा सविस्तर अहवाल सादर करण्याच्या सूचना महापालिकेला दिल्या आहेत. महापालिकेच्या पहिल्या सर्वसाधारण सभेत प्रशासनाने पर्वती विधानसभा मतदारसंघात विविध विकासकामे करण्यासाठी ३२ कोटी ८३ लाख रुपयांचा निधी देण्यासाठी स्थायी समितीच्या बैठकीत मंजूर केलेला प्रस्ताव प्रशासनाने उपसूचना देत मागे घेतला. प्रस्ताव मागे घेताना तांत्रिक आणि प्रशासकीय सुधारणा करण्यासाठीचे कारण देण्यात आले होते.

सर्वसाधारण सभेत प्रशासनाने प्रस्ताव मागे घेण्याच्या प्रक्रियेवर नगरविकास राज्यमंत्री मिसाळ यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. कोणत्या नियमानुसार हा प्रस्ताव मागे घेतला, याचा खुलासा द्यावा, असे पत्र महापालिका मिसाळ यांनी आयुक्त राम यांना पाठविले आहे. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत महानगरपालिका कायदा, १९४९ च्या कलम ७२ (ब) अंतर्गत दोन प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवण्यात आले होते. मात्र प्रशासनाने केवळ पर्वती मतदारसंघाशी संबंधित प्रस्ताव का मागे घेतला, याचा खुलासा करावा, असे म्हटले आहे.

### पर्वतीतील ३२.८३ कोटींचा प्रस्ताव मागे; स्पष्टीकरणाची मागणी

» महापालिकेच्या पहिल्या सर्वसाधारण सभेत स्थायी समितीने मंजूर केलेला हा प्रस्ताव उपसूचनेद्वारे मागे घेण्यात आला. महानगरपालिका कायदा १९४९ च्या कलम ७२ (ब) अंतर्गत दोन प्रस्ताव सभेपुढे ठेवण्यात आले होते. मात्र केवळ पर्वती मतदारसंघाशी संबंधित प्रस्तावच मागे घेण्यात आल्याने संशय व्यक्त होत आहे. इतर प्रस्तावांवर कारवाई झाली असताना हा प्रस्तावच का थांबवण्यात आला, याचे स्पष्टीकरण देण्याचे निर्देश राज्यमंत्री मिसाळ यांनी दिले आहेत.

### काय आहे प्रकरण ?


» राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी पर्वती मतदारसंघातील विविध नागरी सुविधा आणि विकास प्रकल्पांसाठी पुणे महानगरपालिकेकडून निधीची विनंती केली होती. १६ सप्टेंबर २०२५ रोजी त्यांच्या पत्रानंतर आणि अधिकाऱ्यांबरोबर झालेल्या बैठकीनंतर, महानगरपालिका प्रशासकांनी महाराष्ट्र महानगरपालिका कायदा, १९४९ च्या कलम ७२(ब) अंतर्गत एकूण २१ विकासकामांसाठी ३२.८३ कोटी रुपयांची आर्थिक आणि प्रशासकीय मान्यता दिली. ६ फेब्रुवारीला झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत पालिकेच्या मुख्य सभेकडे या कामांची शिफारस करण्यात आली. १८ फेब्रुवारीला होणाऱ्या सर्वसाधारण सभेच्या एक दिवस अगोदर १७ फेब्रुवारीला महापालिका आयुक्त राम यांनी नगरसचिव यांना पत्र लिहून हा प्रस्ताव कार्यपत्रिकेवरून मागे घेण्याचे आदेश दिले होते.

### प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न

» 'पर्वती विधानसभा मतदारसंघातील विकासकामे करण्यासाठी निधी उपलब्ध व्हावा, यासाठी हा प्रस्ताव ठेवला होता. नगरविकास खात्याचे राज्यमंत्री म्हणून काम करत असताना स्थायी समितीच्या बैठकीत मान्य झालेला प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मागे घेणे ही प्रक्रिया सभागृहाच्या नियमांविरुद्ध आहे. हा प्रस्ताव मागे घेताना पर्वती मतदारसंघाच्या आमदार म्हणून कोणतीही चर्चा न करता तसेच कोणतीही पूर्वसूचना न देता, आयुक्तांनी हा प्रस्ताव मागे घेतला जाईल, असे प्रसारमाध्यमांमध्ये सांगणे हा प्रकार म्हणजे प्रतिमा मलीन करणे आणि अपमान करण्याचा आहे,' असेही राज्यमंत्री मिसाळ यांनी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांना पाठविलेल्या पत्रात म्हंटले आहे.

# ओतूरमध्ये दिवसाढवळ्या बिबट्याचा संचार; शेतकरी भयभीत

## जुन्नर तालुक्यातील गाढवे पट भागात व्हिडिओ व्हायरल; वनविभागाकडे तातडीच्या कारवाईची मागणी



**पुणे | प्रतिनिधी**

ओतूर (ता.जुन्नर) हद्दीतील गाढवे पटात बिबट्याचा दिवसा संचार होत असल्याने शेतकरी व ग्रामस्थांमध्ये यांनी भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संदीप बबन गाढवे यांच्या शेतातील गहू व कांद्याच्या पिकामध्ये बिबट्या मुक्तपणे फिरताना अनेकांना दिसल्याची घटना मंगळवारी (दि.२४) सकाळी ९ वाजण्याच्या दरम्यान घडली असून दीपक गाढवे या शेतकऱ्याने याबाबत माहिती दिली आहे.

मंगळवारी सकाळच्या सुमारास शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यांना अचानक बिबट्या दिसून आला. काही शेतकऱ्यांनी प्रसंगावधान राखत सुरक्षित अंतरावरून मोबाईलमध्ये त्याचा व्हिडिओ चित्रित केला. हा व्हिडिओ परिसरात वेगाने व्हायरल होत असून ग्रामस्थांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गाढवे पट भागात दाट लोकवस्ती आहे,आता बिबट्या दिवसाही वस्तीच्या जवळ दिसत असल्याने शेतकरी शेतात जाण्यास घाबरत आहेत. विशेषतः लहान मुले व जनावरांच्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

परिसरात दाट उस, गहू व कांद्याची शेती असल्याने वन्यप्राण्यांना लपण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाल्याचे स्थानिकांचे मत आहे. वनविभागाने या घटनेची तातडीने दखल घेऊन परिसरात पाहणी करावी, पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करावे तसेच ग्रामस्थांना सतर्कतेच्या सूचना द्याव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. दरम्यान, ग्रामस्थांनी एकटे शेतात न जाणे, लहान मुलांना बाहेर सोडू नये व रात्रीच्या वेळी विशेष दक्षता घ्यावी, असे आवाहन वनविभागाच्या वतीने करण्यात येत आहे.

ओतूर (ता.जुन्नर) हद्दीतील गाढवे पटात बिबट्याचा दिवसा संचार होत असल्याने शेतकरी व ग्रामस्थांमध्ये यांनी भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संदीप बबन गाढवे यांच्या शेतातील गहू व कांद्याच्या पिकामध्ये बिबट्या मुक्तपणे फिरताना अनेकांना दिसल्याची घटना घडली

### बिबट्याचा दिवसाढवळ्या वावर

» ओतूर (ता. जुन्नर) येथील गाढवे पट परिसरात मंगळवारी सकाळी शेतात बिबट्या दिसल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे. गहू व कांद्याच्या पिकात फिरताना त्याचा व्हिडिओही चित्रीत करण्यात आला. दाट लोकवस्ती आणि शेतीमुळे वन्यप्राण्यांना लपण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली असल्याचे स्थानिकांचे मत आहे. वनविभागाने तातडीने पाहणी करून पिंजरा लावावा, अशी मागणी होत आहे.